# मिरा भाईंदर महानगरपालिका

उपायुक्त (मु.) यांचे कार्यालय,
ई-मेल : dmchq@mbmc.gov.in
जा.क्र.मनपा/उपायुक्त(मु.)/४०० /२०२५-२६
दि. 14 /01 /२०२६

निवडणूक तात्काळ :-

**आदेश**

**विषय : BLO कर्मचारी यांनी मतदान केंद्रावर उपस्थित राहणेबाबत.**

मा. राज्य निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या कार्यक्रमानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता दि. १५/०१/२०२६ रोजी मतदान व दि. १६/०१/२०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. मा. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणुकीचे कामकाज करणेकरिता निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील तसेच विविध पथकात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

परंतु ज्या BLO कर्मचारी यांची मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या कामकाजाकरिता नेमणूक करण्यात आलेली नाही, अशा कर्मचाऱ्यांनी दि. १५/०१/२०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता मतदारांना सहाय्य / मागदर्शन करणेकरिता मतदार यादीसह मतदान केंद्रावर उपस्थित राहावे. जे BLO कर्मचारी उपस्थित राहणार नाहीत त्यांचेवर निवडणूक कामकाजात अडथळा निर्माण केल्यामुळे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (मु.) तथा**
**उप-निवडणूक अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.)**

**प्रति,**
**सर्व BLO कर्मचारी, मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव :**
**मा. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\9. निवडणूक 2025\पत्र\22. आदेश.docx